कापुCC

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

पी.ओ. कृषि नगर, अकोला (म.रा.)-४४४ १०४.

वाचा - १. विद्यापीठ परिपत्रक क्र बीबीए/अध्ययनरजा/२०१३ दिनांक ३१ जानेवारी, २०१३
२. विद्यापीठ परिपत्रक क्र बीबीए/अध्ययनरजा/२०१३ दिनांक २० ऑक्टोबर, २०१९
३. महाराष्ट्र शासन पत्र क्र मकृवि-१०२१/प्र.क्र. १५४/६-अे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२
४. महाराष्ट्र शासन पत्र क्र संकीर्ण -१५२३-प्र.क्र.७४/६-अे दिनांक ३१ मे, २०२३

## परिपत्रक

क्र.बीबीए/अध्ययनरजा/परिपत्रक/२०२४/4422 दिनांक १५ मार्च, २०२४

संदर्भ क्र १ व २ चे परिपत्रकाचे अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ नुसार अध्ययन रजेचा प्रस्ताव सादर करतांना कार्यालय प्रमुख, नियंत्रण अधिकारी व नियंत्रक व कुलसचिव कार्यालयामध्ये समन्वय साधुन प्रस्ताव शिघ्रतेने निकाली काढण्याच्या दृष्टिने एकत्रीत मार्गदर्शक सुचना सदरील विद्यापीठ परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

विद्यापीठातील संबधित अधिकारी / कर्मचारी अध्ययन रजेचे प्रस्ताव या कार्यालयास संदर्भ १ व २ चे परिपत्रकान्वये सादर करीत असतात सदर परिपत्रकामध्ये सुस्पष्टता असुन देखील संबधितामध्ये व कार्यालय प्रमुखामध्ये समन्वयाच्या अभावाने अध्ययन रजेचे बरेच प्रस्तावामध्ये खालील त्रुटी आढळून आल्याचे निदर्शनास आलेले आहे.

- या कार्यालयास अपुर्ण, विलंबाने तसेच अध्ययन रजेवर कर्मचारी गेल्यानंतर अध्ययन रजेचा कालावधी पुर्ण झाल्यावरही तसेच अध्ययन रजा सुरू झाल्यानंतर प्रस्ताव सादर करण्यात येतात .
- प्रस्तावामध्ये सादर करण्यात आलेले बंधपत्र विलंबाने सादर करण्यात येत असते तसेच व्दितीय वषाकरीताचे प्रस्तावामध्ये प्रथम वर्षाचे बंधपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक असून सुध्दा प्रस्तावामध्ये जोडण्यात येत नाही.
- अध्ययन रजेचे शैक्षणीक वर्ष चुकीचे नमुद करणे.
- अध्ययन रजा प्रस्ताव सादर करतांना विहीत केलेल्या प्रमाणपत्रामध्ये नियंत्रण अधिकारी यांचे नाव, पदनाम व शिक्का घेतला जात नाही.
- अध्ययन रजेसाठी कार्यमुक्त केल्यानंतर रजा मंजुर नसुन सुध्दा सदर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते नियमित आहरण व सवितरण अधिकारी यांचे मार्फत निर्गमित होत असतात.
- बरेच कर्मचारी प्रथम एक वर्ष अध्ययन रजा मंजुर झाल्यानंतर वाढीव व्दीतीय वर्षाकरीता अध्ययन रजा मंजुरीचा प्रस्ताव सुध्दा विहीत कालावधीमध्ये या कार्यालयास प्राप्त होत नाहीत.
- या कार्यालयाव्दारे अध्ययन रजेच्या सादर झालेल्या प्रस्तावामध्ये त्रुटी आढळल्यास प्रस्ताव संबधित कार्यालयास त्रुटीची पुर्तता करण्याकरीता नस्ती पाठविण्यात येत असतांना सदर त्रुटीची पुर्तता संबधित कार्यालयाव्दारे विलबांने सादर करण्यात येते.
- बऱ्याच अध्ययन रजेच्या प्रस्तावामध्ये सेवापुस्तकामध्ये आवश्यक नोंदीची नोंद न घेता प्रस्ताव सादर केले जातात.

२..

तथापि आता संदर्भ क्र ३ चे पत्रानुसार शासनाने विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांचे अध्ययन रजा मंजुरीचे प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांचेमार्फत शासनास मंजुरीकरीता सादर करण्याचे निर्देशित केलेले आहे. करीता सर्व संबधित अधिकारी /कर्मचारी व कार्यालयप्रमुख, आहरण व सवितरण अधिकारी, तसेच नियंत्रण अधिकारी यांना खालील प्रमाणे सुचना सदरील परिपत्रकाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

करीता सर्व कार्यालय प्रमुख,आहरण व संवितरण अधिकारी, नियंत्रण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमुद केलेले मुद्दे लक्षात न घेता अध्ययन रजेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आला असल्यास सदर प्रस्ताव कृषि परिषदेमार्फत शासनास सादर केला जाणार नाही व त्यामुळे या पुढे अध्ययन रजेचा प्रस्ताव सादर करतेवेळी संदर्भधिन अनु क्र. १ व सदरील विद्यापीठ परिपत्रकान्वये कार्यवाही करून वरिल मुद्यांची पुर्तता काटेकोरपणे होत आहे याची खातरजमा करूनच अध्ययन रजेचा परिपुर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत. यापुढे या कार्यालयास विहीत कालावधीमध्ये प्राप्त अध्ययन रजेच्या अपुर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्यात येणार नाही तसेच अध्ययन रजेचा प्रस्ताव एकतर्फी नामंजुर करण्यात येईल याची संबधितांनी नोंद घ्यावी नाही.

तसेच उक्त परिपत्रकामध्ये उपस्थितीत मुद्दे लक्षता न घेता प्रस्ताव सादर केल्यास संबधित कर्मचाऱ्याच्या होणाऱ्या आर्थीक व शैक्षणीक नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घ्यावी.

**उपरोक्त परिपत्रक विद्यापीठ हितार्थ निर्गमित करण्यात येत असुन त्याची तात्काळ अमंलबजावणी करण्यात यावी.**

**मा.कुलगुरूंचे मंजुरी व आदेशानुसार.**

स्वाक्षरीत/-
कुलसचिव,
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला

प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीकरीता -
१.अधिष्ठाता, कृषि,/कृषि अभियांत्रिकी/उधानविद्या, डॉ.पंदेकृवि, अकोला.
२.अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी, डॉ.पंदेकृवि, अकोला.
३.संचालक, संशोधन / विस्तार शिक्षण, डॉ.पंदेकृवि, अकोला.
४.सहयोगी अधिष्ठाता, डॉ.पंदेकृवि (सर्व)------------------------------------------.
५.विभाग प्रमुख, डॉ.पंदेकृवि, अकोला (सर्व)------------------------------------------.
६.प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र (सर्व)------------------------------------------.
७.कार्यालय प्रमुख, अ.भा.स.सं. प्र. (सर्व)------------------------------------------.
८.नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ.पंदेकृवि, अकोला.
९.उपकुलसचिव, विद्याविषयक / सामान्य प्रशासन विभाग, डॉ.पंदेकृवि, अकोला.
१०. प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली यंत्रणा डॉ. पं.दे.कृ.वि.अकोला यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकशित करण्यात यावे.

कुलसचिव १९/०३
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला.

आवक क्र. 679 दि. 19/3/24

Order-M (I)